www.epunyanagari.com
Toll Free 18002081019

# पुण्य नगरी

पुणे-सातारा ◆ शुक्रवार, ८ ऑक्टोबर २०२१ ‖ वर्ष : २२ ‖ अंक : ३३१ ‖ पाने : १०+४ = १४ किंमत : ५.००

# रयत शिक्षण संस्था देशाचे भूषण - ना. उदय सामंत

**सातारा / प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेत सर्वसामान्यांची मुले शिकत आहेत. या शिक्षण संस्थेत काळाच्या गरजेनुसार कौशल्यपूर्ण शिक्षण देण्यासोबतच शिक्षण पूर्ण झाल्यानंतर मुलांना रोजगारही उपलब्ध करुन दिला जात आहे. ही संस्था देशाचे भूषण असून या संस्थेचा आदर्श देशातील इतर संस्थांनी घ्यावा, असे प्रतिपादन उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी केले.



सातारा : रयत शिक्षण संस्थेचा १०२ वा वर्धापनदिनानिमित्त बोलताना उदय सामंत, व्यासपीठावर अनिल पाटील, डॉ. विठ्ठल शिवणकर, रामशेठ ठाकुर आदी.

यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्युट ऑफ सायन्स सातारा येथे रयत शिक्षण संस्थेचा १०२ वा वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आ. बाळाराम पाटील, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, सचिव डॉ. विठ्ठल शिवणकर, रामशेठ ठाकूर आदी उपस्थित होते.

उदय सामंत म्हणाले, पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शिक्षण क्षेत्रातील काम अमुल्य असे आहे. या संस्थेत साडेचार लाखहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संस्थेचे काम आदर्शवत असून संस्थेसाठी शासनाकडून सर्व सहकार्य करण्यात येईल. देशातील विद्यार्थी बाहेरील देशातील विद्यापीठ पाहण्यासाठी, तेथे शिक्षण घेण्यासाठी जातात. भविष्यात रयत शिक्षण संस्था पाहण्यासाठी बाहेरील विद्यार्थी इथे येतील तसेच मुंबई, पुणे येथील विद्यार्थी रयत शिक्षण संस्थेत शिक्षणासाठी येतील असा विश्वासही यावेळी त्यांनी व्यक्त केला.

यावेळी डॉ. पाटील म्हणाले, रयत शिक्षण संस्थेचा वर्धापनदिन समाजाने दिलेल्या योगदानाचे कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी साजरा केला जात आहे. रयत शिक्षण संस्थेच्या जडण-घडणीत प्रबोधनकार ठाकरे यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. संस्थेकडून काळाच्या गरजेनुसार मुलांना शिक्षण देत असल्याचे त्यांनी सांगितले. प्रारंभी श्री. सामंत यांच्या हस्ते रयत विज्ञान पत्रिकेचे प्रकाशन व ई-रयत ॲपचा शुभारंभ करण्यात आला.

### कर्मवीर ग्रामीण विद्यापीठास सर्वतोपरी सहकार्य

रयत शिक्षण संस्था ही देशाचे भूषण असून रयतच्या कर्मचीर ग्रामीण विद्यापीठ निर्मितीसाठी सर्वोतपरी सहकार्य राहील. आगामी काळात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या संदर्भातही चरित्र सधन समिती स्थापन करणार आहे. त्यांच्या चारित्र्यावर खंड निर्माण केला जाईल व तो त्यांच्या संस्थेत शिकणाऱ्या सर्व विदद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे. रयतच्या प्रत्येक विद्यार्थ्याला कर्मवीर कळले पाहिजेत. अशी अपेक्षा ना. उदय सावंत यांनी व्यक्त केली.

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा